CMYK

बीड । गुरुवार

१०.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : १००

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955






# रुग्णांचे हाल; प्रशासन बेहाल
# जिल्हा रुग्णालय राम भरोसे !

● जिल्हा शल्य चिकित्सक राऊत साधे भोळे, प्रशासनाचा कारभार इतरच हाकू लागले...
● औषधांचा तुटवडा ; डॉक्टरांची गैरहजरी, जिल्हा रुग्णालयात बनला कळीचा मुद्दा...

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गरजवंत व खाजगी रुग्णालयात उपचार पिल्ल न शकणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी जीवदान देणारे रुग्णालय आहे. जिल्हाभरातून विविध उपचारासाठी रुग्ण जिल्हा रुग्णालयात उपचार अर्थ येतात. शहराचा केंद्रबिंदू ठरलेला जिल्हा रुग्णालय सुविधांचा केंद्रबिंदू ठरला आहे. डॉक्टर अशोक थोरात यांच्या निलंबनानंतर या ठिकाणी प्रभारी म्हणून कार्यरत असणारे डॉक्टर राऊत सरळ साधे रुग्ण पाहणारे जिल्हा शल्य चिकित्सक असल्याने त्यांच्या कारभाराचा इतरच फायदा घेऊ लागले आहे. विशेष म्हणजे प्रशासनावर डॉक्टर राऊत यांची पकड नसल्याने या ठिकाणी सध्या तरी तीन डॉक्टरांचा समूह प्रशासनाचा कारभार हाकत आहे. जिल्हा रुग्णालयात औषधांचा तुटवडा, डॉक्टरांची गैरहजरी, मन वाटेल तेव्हा कर्मचारी हजर असल्याचे चित्र असल्याने येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचे हाल होत आहे. जिल्हा रुग्णालय सध्या तरी राम भरोसे चालत असल्याचे चित्र आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर राऊत यांच्याकडे प्रभारी पदाचा कारभार प्रशासनाने सोपावला मात्र सरळ व मितभाषी असल्याने जिल्हा रुग्णालयात ठाण मांडून बसलेल्या अनेक डॉक्टरांनी राऊत यांच्याकडे साप दुर्लक्ष केले आहे. प्रशासनावर डॉक्टर राऊत यांची पकड नसल्याने कर्मचारी मनाला वाटेल तेव्हा जिल्हा रुग्णालयात असतात. या ठिकाणी अनेक तक्रारी करण्यात येतात मात्र याचा निपटारा होत नसल्याने डॉक्टर राऊत हे चांगले डॉक्टर आहेत मात्र प्रशासनावर त्यांची पकड नसल्याने याचा फायदा या ठिकाणी डेपुटेशनवर असणारे डॉक्टर घेत आहेत. आपणच येथील कारभारी असल्याचे दाखवत अधिकार गाजवत असल्याने नेमके डॉक्टर राऊत आपल्या कार्यालयात बसून करता तरी काय असा प्रश्न उपस्थित होत असून बीड जिल्हा रुग्णालयाचा कारभार खमक्या जिल्हा शल्य चिकित्सकडे हसायला हवा अशी चर्चा जिल्हा रुग्णालय परिसरात होत आहे.

### ● दंत चिकित्सक हजर मात्र अवजार नसल्याने रुग्णांचे हाल

जिल्ह्यातून दातांची तपासणी करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना दंत चिकित्सक यांच्या केबिन बाहेर ताटकळत बसावे लागत आहे. यानंतर नंबर लागताच तपासणी झाल्यास उपचारासाठी लागणारे यंत्रसामग्रीच दंत चिकित्सक यांच्याकडे उपलब्ध नसल्याने फक्त तपासणी करून रुग्णांना पाठवले जात असल्याचे चित्र दिसत आहे. व इतर महत्त्वाचे अवजार दातांच्या डॉक्टराकडे उपलब्ध नसल्याने जिल्हा प्रशासनाचा भोंगळ कारभार या ठिकाणी दिसून येत आहे.

### ● रुग्णवाहिकेचे चालक अनेक वेळा कॉल करूनही हजर नसतात

जिल्हा रुग्णालयात असलेल्या स्त्री रुग्ण व अत्यंत आवश्यक असणाऱ्या रुग्ण वाहिकेचे चालक यांच्याकडे कॉल सेंटरवरून कॉल दिल्या गेल्यानंतरही अनेक वाहन चालक दिशाभूल करतात. रस्त्यात आहे वेळ लागेल बाहेर आहे दुसरी रुग्णवाहिका पहा वाट बघावी लागेल अशी उत्तरे नेहमीचीच झाली आहे. कॉल सेंटर वरून सरळ रुग्णवाहिकेच्या चालकाला कॉल दिल्यानंतरही वेळेत येत नसल्याने अनेक रुग्णांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिक्षकांसमोर सरकार झुकलं, सर्व मागण्या मान्य

**मुंबई । प्रतिनिधी**



मुंबईतील आझाद मैदानावर चार दिवसांपासून विनाअनुदानित शिक्षकांचं आंदोलन सुरु होतं. आता या आंदोलनाला यश आलं आहे. सरकारने या शिक्षकांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी शिक्षकांनी भेट घेतली त्यानंतर बोलताना त्यांनी शिक्षकांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याची घोषणा केली. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

### ● शिक्षकांच्या मागण्या मान्य

शिक्षकांच्या मागण्या मान्य केल्याची घोषणा करताना महाजन म्हणाले की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. अतिशय धाडसी निर्णय फडणवीसांनी त्यावेळी घेतला. त्यानुसार, २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के दिले. मात्र सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळं पुढचे टप्पे देण्यास उशीर झाला आहे. तुम्ही याबाबत वारंवार मागणी करत होतात.'

### ● या तारखेला पगार मिळणार

पुढे बोलताना महाजन म्हणाले की, 'आता तुमच्या पगाराचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. तुमच्या शिक्षकांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# कर्जाच्या नावाखाली जमिनी विकल्या

**शेतकऱ्यांच्या नावाने १लाख,५९ हजारांचा किराणा लाटला?**

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीत दिवसेंदिवस झालेले अनेक घोटाळे उघडकीस आले असताना लेखा परीक्षण अहवाल २०२१ काळात आकस्मिक खर्च नोंदवून बाजार समितीने आवारातील गरजू शेतकऱ्यांना किराणा वाटप च्या नावाखाली व्यंकटेश किराणा येथून १लाख,५९हजार ४६४रु. दाखवून बाजार समिती कडुन लाटण्याचा प्रकार सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राऊत यांनी उघडकिस आणला. बाजार समितीतीचे सचिव,सभापती यांनी केलेल्या घोटाळ्या प्रकरणी अधिक माहिती अजय राऊत प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे यात म्हटले आहे की,२०१८ ते२१या कोविड काळात संपूर्ण जगात ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'तुमचे नवरे निवडा'; सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलींची शिक्षकाने काढली छेड

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सुर्डी (सोनेसांगवी) येथील जिल्हा परिषद शाळेतील एका नराधम शिक्षकाने चक्क सहावीच्या वर्गात शिकत असलेल्या अल्पवयीन मुलीची छेड काढून शिक्षण क्षेत्राला आणि शिक्षकी पेशाला काळिमा फासण्याचा निंदनीय प्रकार केला आहे. हा खळबळजनक प्रकार उघड झाल्यामुळे नागरिकांत तीव्र संतापाची लाट निर्माण झालेली आहे. दि. ३ जुलै २०२५ रोजी गुरुवारी दुपारी २:०० वा. च्या दरम्यान शाळेच्या मध्यंतर वेळी कॅरम खेळत असलेल्या सहावीच्या



मुलींच्या अंगाला वाईट हेतूने स्पर्श केला आणि त्यांच्याशी तुमचे नवरे निवडा, अशा प्रकारे बोलून त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. त्या नंतर एका मुलीनी हा प्रकार घरी तिच्या पालकांना सांगितला. त्यानंतर दि. ८ जुलै रोजी एका पालकाने गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर ▶▶ उर्वरित पान २ वर

# आर्किटेक शेख आर्शद लिखित इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग हे पुस्तक खा.शरदचंद्र पवार यांना प्रदान

### ● खा.शरदचंद्र पवारांकडून शेख अर्शद यांचे कौतुक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पीस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व संपूर्ण देशात प्रसिद्ध असलेले आर्किटेक शेख अर्शद यांनी लिहिलेल्या इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग हे देशाचे नेते खा.शरदचंद्र पवार यांना प्रदान केले. पुस्तक पाहून व काही संदर्भ जाणून घेतल्यानंतर खा.पवार यांनी शेख



अर्शद यांचे कौतुक करत हे पुस्तक नव्या पिढीला प्रेरणा देईल असा आशावाद व्यक्त केला. आर्किटेक शेख अर्शद हे व्यवसाय सांभाळत साभाळत मुस्लिम समाजामध्ये व विशेषत तरुण पिढीमध्ये येणार्या आव्हानांविषयी जनजागृती करुन मुस्लिम तरुणांना एक विकासाचा व प्रगतीचा मार्ग दाखवत आहेत. पीस फाउंडेशन हे सातत्याने इस्लाम आणि मानवता धर्म यावर काम करतो आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# कामगार शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ इंटक व ईपीएस ९५ कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन




**बीड । प्रतिनिधी**

सरकारच्या कॉर्पोरेट समर्थक ,कामगार विरोधी आणि शेतकरी विरोधी धोरणा विरुद्ध विविध १० केंद्रीय कामगार संघटनेच्या वतीने दि. ९ जुलै २०२५ बुधवार रोजी सेवानिवृत्त ईपीएस ९५ कर्मचारी समन्वय समिती बीड व इंटक काँग्रेस संघटना बीडच्या वतीने ▶▶ उर्वरित पान २ वर

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**१ लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त ; ६ आरोपी जेरबंद ; पो.नि. शरद जोगदंड यांची कामगिरी**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने तिरट नावाच्या जुगारावर धाड टाकून सहा जणांना अटक केली. या कारवाईत १ लाख ३९ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून यामध्ये रोख रक्कम, ३ मोटरसायकल्स व मोबाईल्स यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक



नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

# संपादकावर हल्ला करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करण्याची निर्भीड पत्रकार संघाची जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील संपादक खम रूल इमान यांच्यावर शैक्षणिक संस्थांच्या विरोधात बातमी छापल्याच्या रागातून संस्था चालकाच्या सांगण्यावरून शिक्षकांनी हल्ला केला. या हल्ल्याचा जिल्हाभरातून पत्रकारांच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. निर्भीड पत्रकार संघ बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना लेखणीचा आवाज दाबणाऱ्या शिक्षकांना व संस्थाचालकांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. पत्रकारांच्या व संपादकांच्या एकजुटीमुळे संपादकांच्या फिर्यादीवरून संबंधित संस्था



चालक व शिक्षकावर पत्रकार हल्ला विरोधी कायद्याअंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. संबंधित आरोपी फरार झाले असून आरोपींना तात्काळ अटक करण्याचे निवेदन निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना देण्यात आले आहे. यावेळी संघाचे अध्यक्ष देवेंद्रसिंग ढाका, संपादक समीर काझी, महिला विभागाच्या जिल्हा अध्यक्ष किरण डोळस, उपाध्यक्ष मोनिका बेदरे, जिल्हा सचिव आम्रपाली साबळे, सदस्य भैय्यासाहेब गव्हाणे, उर्मिला उनवणे, आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचा तुघलकी निर्णय

**इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अंबाजोगाई शाखेनं केलं आंदोलन**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई शाखेने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने ३० जून २०२५ रोजी जारी केलेल्या वादग्रस्त अधिसूचनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या अधिसूचनेनुसार, केवळ एका वर्षांचा ब्रिज कोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना अलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याच्या परवानगी सोबतच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या नोंदणी पुस्तकामध्ये नोंदणीची परवानगी



देण्यात आली आहे. इंडिअन मेडिकल असोसिएशनच्या मते, हा निर्णय संपूर्ण आधुनिक वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेचा व नैतिकतेचा अवमान करणारा असून रूग्णांच्या आरोग्याशी गंभीर धोका निर्माण करणारा ▶▶ उर्वरित पान २ वर







CMYK

# गुरूपौर्णिमा का साजरी केली जाते ? थोडक्यात जाणून घ्या यामागील कथा आणि महत्त्व...




**● १० जुलैला गुरूपौर्णिमा आपण साजरी करणार आहोत. हिंदू पंचांगनुसार, आषाढ शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी गुरूपौर्णिमेचा सण हा साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व हे फारच खास आहे.**

**● कधी आहे गुरूपौर्णिमा ?**

ज्या तारखेला सूर्योदय होतो ती तारीख वैध असते. त्यामुळे गुरुपौर्णिमेचा हा सण १० जुलैलाच साजरा केला जाईल. गुरुवारी गुरुपौर्णिमेच व्रत देखील केलं जाणार आहे. गुरुपौर्णिमेला दानधमला खूप महत्त्व आहे. चला तर जाणून घेऊया गुरुपौर्णिमा का साजरी केली जाते आणि गुरुपौर्णिमेची कथा नेमकी काय आहे ?

**● काय आहे गुरूपौर्णिमेचे महत्त्व ?**

गुरुपौर्णिमेच्या दिवशी शिक्षकांचा आदर करणे आणि त्यांना गुरुदक्षिणा देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या दिवशी एखाद्या व्यक्तीने आपल्या गुरू आणि गुरुसमान ज्येष्ठांना आदर आणि सन्मान देऊन कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे, असेही मानले जाते. याशिवाय जीवनात मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना गुरुदक्षिणा देणेही महत्त्वाचे आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी व्रत, दान आणि उपासनेलाही खूप महत्त्व आहे. गुरुपौर्णिमेला उपवास करून दानधर्म करणाऱ्या व्यक्तीला जीवनात ज्ञानाची प्राप्ती होते आणि परलोकात मोक्ष प्राप्त होतो असे मानले जाते.

**● गुरूपौर्णिमेला व्यास पौर्णिमा का म्हणतात ?**

इसवी सन पूर्व ३००० च्या सुमारास आषाढ शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी महाभारताचे लेखक वेद व्यास यांचा जन्म झाला. वेद व्यासजींच्या स्मरणार्थ दरवर्षी आषाढ शुक्ल पौर्णिमेला गुरुपौर्णिमेचा दिवस केला जातो. असे मानले जाते की, या दिवशी वेद व्यासजींनी भागवत पुराणाचे ज्ञान देखील दिले होते. गुरुपौर्णिमेला व्यास पौर्णिमा असेही म्हणतात.

**● काय आहे संपूर्ण कथा ?**

महाभारताचे लेखक वेद व्यास यांचा जन्म आषाढ महिन्याच्या पौर्णिमेला झाला. वेद व्यासांच्या बालपणाची ही गोष्ट आहे. वेद व्यासांनी आपल्या आई-वडिलांकडे देव पाहण्याची इच्छा व्यक्त केली परंतु त्यांची आई सत्यवती यांनी त्यांची इच्छा पूर्ण करण्यास नकार दिला. जेव्हा वेद व्यास हे हट्ट करू लागले तेव्हा आईने त्यांना जंगलात जाण्याचा आदेश दिला. निघताना त्यांच्या आईने वेद व्यास यांना सांगितले की, ''जेव्हा तुम्हाला घरी यावेसे वाटले तेव्हा परत या.'' त्यांनी जंगलात अत्यंत कठोर तपश्चर्या केली. या तपश्चर्येच्या प्रभावामुळे वेद व्यासजींना संस्कृत भाषेचे भरपूर ज्ञान झाले. मग त्यांनी चार वेदांचा विस्तार केला. एवढेच नाही तर त्यांनी महाभारत, अठरा पुराणे आणि ब्रह्मसूत्रांची रचना केली. महर्षी वेद व्यास यांना चारही वेदांचे ज्ञान होते म्हणूनच गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरूंची पूजा करण्याची परंपरा सुरू आहे. वेद व्यासजींनी भागवत पुराणाचे ज्ञानही दिले.

## पान १ वरून पुढे...

## रुग्णांचे हाल...

ताटकळत बसावे लागत आहे. विशेष म्हणजे निशुल्क सेवा देणारी रुग्णवाहिका असल्याने वाहन चालक आपल्या पगारापुरते काम करत असल्याचे दिसून येत आहे यावर कोणाचेही अंकुश नसल्याने रुग्णवाहिका चालकांचे मनोबल उंचावले आहे.

### औषध साठ्यांचा तुटवडा

बीड जिल्हा रुग्णालयात सतत औषधांचा तुटवडा जाणवत आहे या ठिकाणी स्थानिक एजन्सी कडून औषध पुरवठा केला जातो तसेच शासनाकडे मागणी करताना योग्य रीतीने पुरवठ्याची मागणी होत नसल्याचे चर्चा आहे. या ठिकाणी महत्त्वाचे असणारे इंजेक्शन नेहमीच आढळत नसल्याने नेमके या ठिकाणी आलेल्या महत्त्वाच्या इंजेक्शनचे काय होते असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सध्या शहरात गॅस्ट्रोची साथ आहे मात्र जिल्हा प्रशासन यापासून आणि विघ्न असून जिल्हा रुग्णालयात या संबंधाच्या औषधी नसल्याने रुग्णांना तपासणी केल्यानंतर बाहेरून औषधी घ्यावी लागत आहे.

### सोनोग्राफी साठी लांबच्या लांब रांगा

जिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी साठी येणाऱ्या महिलांना तब्बल तीन तीन तास सोनोग्राफीसाठी वाट पाहावी लागत आहे. या ठिकाणी एकच टेक्निशियन व एकच सोनोग्राफी मशीन सुरू आहे यामुळे जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात डिलिव्हरी साठी व इतर शस्त्रीकेसाठी येणाऱ्या महिलांना व नागरिकांना सोनोग्राफी करण्यासाठी बाहेर ताटकत बसावे लागत आहे. जिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी साठी कर्मचाऱ्यांची कमतरता व सोनोग्राफी एकच असल्याने या ठिकाणी दररोज सोनोग्राफीसाठी भली मोठी रांग दिसून येथे.

### जिल्हा रुग्णालयाचे कारभारी दुसरेच

जिल्हा शिल्लक चिकित्सक पदी डॉक्टर राऊत यांची नियुक्ती प्रशासनाने केली आहे मात्र या ठिकाणी जिल्हा रुग्णालयाचा कारभार इतरांच्या हाती दिसून येत आहे. कोणतीही घटना असो कारण असो डॉक्टर राऊत यांच्या ऐवजी दुसऱ्याच डॉक्टरांची नावे घेतली जाते. जिल्हा रुग्णालयाचा कारभार पूर्णपणे ढासळला आहे यामुळे या ठिकाणी कर्मचारी व रुग्णांच्या नातेवाईक या अनेक वेळा वाद विवाद होण्याची प्रकरणही वाढली आहेत. जिल्हा रुग्णालयात शिस्तीचे व प्रशासनावर पकड असणारे जिल्हा शल्य चिकित्सक असणे आवश्यक आहे .

## शिक्षकांसमोर सरकार...

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हे ठरलं की, आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे. या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन, येत्या १८ तारखेला अधिवेशन संपल्यावर तुमच्या खात्यात पैसे आलेले असतील. यात कोणताही बदल होणार नाही.'

### शिक्षकांच्या मागण्या काय होत्या ?

राज्य सरकारने ऑक्टोबर २०२४ मध्ये टप्पा अनुदान लागू करण्याची घोषणा केली होती. मात्र घोषणेनंतर प्रत्यक्ष निधी वितरित झालेला नाही. टप्पा अनुदानाचा निर्णय झाल्यानंतर दोन अधिवेशने झाली आहेत, तसेच तिसरे अधिवेशनही सुरु आहे, मात्र सरकारनं पुरवणी मागणी सादर केली नव्हती, त्यामुळे शिक्षकांनी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरू केले होते, आता या आंदोलनाला यश मिळाले आहे.

## कर्जाच्या नावाखाली...

लॉक डाऊन चालू असताना बाजार समितीने जिनिंग वर कापूस घालण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना सावलीसाठी मंडप टाकण्याच्या नावाखाली १६ लाख रुपये बोगस उचलले. यानंतर त्या शेतकऱ्यांना तहान भागवण्यासाठी पाणी पाजण्याच्या महिलांच्या नावाखाली २लाख,५०हजार रुपये उचलले व याच काळात वृक्षारोपण केले दाखवून ५लाख रुपये उचलले असे अनेक घोटाळे याच काळात उघडकीस आले असताना परत एकदा बाजार समितीने आवारातील गरजू शेतकऱ्यांना किराणा वाटप च्या नावाखाली १लाख ५९ हजार रु चे बोगस बिल उचलण्याचा प्रकार दिसून आला यात तो गरजू शेतकरी कोण होता याचे उत्तर बाजार समिती सचिव यांनी द्यावे अशी मागणी राऊत यांनी केली. या अगोदर कर्जाच्या नावाखाली बासच्या जमिनी विकल्या आता शेतकऱ्याच्या नावाखाली किराणा लाटण्याचा प्रकार बाजार समितीत घडला आहे,वास्तविक पाहता बाजार समिती शेतीमालाशी निगडित असल्याने शेतकरी व्यापाऱ्यांच्या नावा खाली घोटाळे करणाऱ्या सचिव,सभापती यांनी कार्यवाही करण्याची धमक दाखवावी असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते अजय सिंह राऊत यांनी केला आहे.

## 'तुमचे नवरे...

यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या बाबतची लेखी तक्रार त्यांना सादर केली. घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ स्वतः गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, केंद्र प्रमुख अर्जुन बोराडे व केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांनी शाळेला भेट देऊन चौकशी केली. निलंबनाची कारवाई करण्यात येणार - शिक्षणाधिकारी- सदर प्रकाराविषयी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी (प्रा.) फुलारी यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी या दोषी शिक्षकावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावर असल्याची माहिती दिली. अद्याप पोलिसांत गुन्हा दाखल नाही : पीडित मुलीच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली असून त्यांनी युसुफवडगाव पोलीस ठाण्याची संपर्क साधलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्या नराधम शिक्षकावर गुन्हा दाखल झालेला नाही. मागील वर्षी देखील याच नराधम शिक्षकाने केली होती आगळीक ! : मागील वर्षी देखील या शिक्षकाने एका शालेय विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता परंतु त्याची गावात वाच्यता झाल्या नंतर सदर प्रकरण हे गावातच तडजोड करून मिटविण्यात आले असल्याची माहिती समजते आहे. शिक्षण विभागाने सुद्धा पोलिसांत तक्रार द्यायला हवी : या प्रकरणी पालकांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिलेली नाही परंतु त्यांनी गटक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार दिली असल्याने त्या संदर्भात त्यांनी पोलिसांना माहिती द्यायला हवी. कारण सदर शिक्षक हा सावकारी आणि प्लॉटिंगच्या व्यवसायात असल्याने तो पालकावर दडपण आणण्याची शक्यता आहे. गटशिक्षाधिकाऱ्याकडे दिली शिक्षकाने त्याच्या गैरकृत्याची कबुली : गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेला भेट देऊन माहिती घेतली असता त्या नराधमाने त्याने केलेल्या गैरकृत्याची कबुली दिली असल्याची माहिती मिळत असून चौकशी अहवालात गट शिक्षणाधिकारी यांनी त्याचा उल्लेख केला असल्याची माहिती मिळते आहे. पालक आणि विद्यार्थ्यात भीतीचे वातावरण : या भयानक प्रकारामुळे शाळेत शिकणारे विद्यार्थी आणि पालक यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आर्किटेक शेख...

शिवाय आर्किटेक शेख अर्शद हे सुद्धा प्रबोधनाचे काम करीत आहेत. येणार्या काळामध्ये मुस्लिम तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत मग त्यात धार्मिक असतील, व्यावसायिक असतील, शैक्षणिक असतील अशा आव्हानांना कश्या पद्धतीने तोंड द्यायचे आणि त्यातून पुढे कसे जायचे असा मौलिक सल्ला व प्रबोधन या माध्यमातून करत आहेत. दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी जावून ते प्रबोधन करीत आहेत. त्यांनी स्वतः यासाठी पुढाकार घेवून इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या पुस्तकाची निर्मिती करुन यावर अनेक प्रश्नांवर प्रकाशझोत टाकला आहे. हे पुस्तक त्यांनी देशाचे जाणते व अनुभवी नेते जे स्वत धर्मनिरपेक्षतेचे राजकारण आणि समाजकारण करीत आहेत. अशा नेतृत्वाला त्यांनी हे पुस्तक भेट दिले आहे. हे पुस्तक पाहिल्यानंतर खा.शरदचंद्र पवार यांनी पुस्तकातील माहिती संक्षिप्त स्वरुपात जाणून घेतला. माहिती जाणून घेतल्यानंतर शरदचंद्र पवार यांनी आर्किटेक शेख अर्शद यांचे कौतुक केले.

## कामगार शेतकरी....

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारत बंदला पाठिंबा देत सरकारच्या विरोधात, कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणे राबवणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, कामगार एकजुटीचा विजय असो, शेतकरी व कामगार विरोधी धोरण रद्द करा अशा घोषणा देऊन निदर्शन करण्यात आली .यावेळी इंटक काँग्रेस व सेवानिवृत्त ईपीएस ९५ कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने पंतप्रधान व केंद्रीय कामगार मंत्री यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कामगार व शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत निवेदन देण्यात आले. सेवानिवृत्त ईपीएस ९५ कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने ईपीएस ९५ पेन्शन धारकांना ९ हजार रुपये व अधिक महागाई भत्ता देण्यात यावा, नसता डिसेंबर २०२५ महिन्यात दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानात सेवानिवृत्त कर्मचारी १९९५ समन्वय राष्ट्रीय समितीच्या वतीने डिसेंबर २०२५ महिन्यात दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानात मोठे धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीया यांना जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पाठवलेल्या वेगळ्या निवेदनाद्वारे केली आहे .यावेळी निवृत्त कर्मचारी ईपीएस ९५ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे, डी आर शेवलीकर ,सुदाम कोळेकर भाऊसाहेब फुंदे, सुधीर देशमुख रणजीत डावकर, इटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधन जमले, सखाराम बेंगडे ,एस आरेकर, मधुसूदन मस्के, हनुमान जगताप हनुमान घोडके भीमराव कुटी बीड शहर मंचचे जिल्हाध्यक्ष नितीन जायभाये, शेख अमीर पाशा ,सौ. गिरी मॅडम आदींची उपस्थिती होती.

## जुगार अड्ड्यावर...

शरद जोगदंड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकामध्ये सहाय्यक निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे, हवालदार मनोज वाघ, अंमलदार भागवत नागरगोजे व हनुमंत चादर यांचा सक्रिय सहभाग होता.

घोड्यावरून दारू वाहतूक करणारा आरोपी जेरबंद: दुसऱ्या कारवाईत, गावठी हातभट्टीची दारू गावोगाव पुरवणाऱ्या एका इसमाला घोड्यासह पकडण्यात आले. आरोपीच्या ताब्यातून ३० लिटर गावठी दारू (६ कॅन) व एक घोडा, असा एकूण ८९,२०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. ही कारवाई देखील वरील वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक जोगदंड आणि त्यांच्या पथकाने केली.

## महाराष्ट्र वैद्यकीय...

आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दिनांक ८ जुलै २०२५ रोजी आय.एम.ए.अंबाजोगाई शाखेच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. या शिष्टमंडळात इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, अंबाजोगाई शाखेचे डॉ.नवनाथ घुगे-अध्यक्ष, डॉ.उद्धव शिंदे -सचिव, डॉ.राहुल धाकडे - उपाध्यक्ष, डॉ.विजय लाड - उपाध्यक्ष, डॉ.निलेश तोष्णिवाल - सहसचिव, डॉ.अतुल शिंदे - सहसचिव, डॉ.बळीराम मुंडे - सह कोषाध्यक्ष, डॉ.सुनिल जाधव - संस्कृतिक सचिव, डॉ.शिवराज पेस्टे - क्रीडासचिव, डॉ.संदिप जोगदंड - क्रीडा सहसचिव, डॉ.अनिल भूतडा, डॉ.सचिन पोतदार, डॉ.विवेक मुळे, डॉ.नागोराव डेरनासे यांची प्रमुख उपस्थिती होती. इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई शाखेने यावेळी नागरिकांमध्ये या निर्णयामुळे सामाजिक आरोग्य धोक्यात कसे येईल याविषयी जनजागृती केली. यामध्ये या अधिसूचनेचे दुष्परिणाम स्पष्ट करून शासनाला या निर्णयाविरोधात तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. आय.एम.ए महाराष्ट्र राज्याने यापुढील आंदोलनात्मक कृती जाहीर केली आहे, त्यामध्ये मंगळवार, दिनांक ८ जुलै रोजी राज्यभर उप जिल्हाधिकारी महोदयांना निवेदन देणे, ११ जुलै रोजी २४ तासांची एकदिवसीय आरोग्य सेवा बंद, १९ जुलै रोजी 'चलो मुंबई' भव्य रॅली असे स्वरूप राहणार आहे. यावेळी बोलतांना महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सरकारने हा तुघलकी निर्णय घेऊन जनतेच्या आरोग्याशी खेळत आहे. सहा वर्षांचा कोर्स जर एका वर्षात पूर्ण होत असेल तर मग एमबीबीएस विद्यार्थ्यांचे पाच वर्षे का वाया घालवित आहेत. सुरक्षित आरोग्य हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे. आणि तो त्यांना मिळालाच पाहिजे. परंतु, या निर्णयाने या अधिकाराला इजा पोचत आहे. तसेच हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने सरकारने लगोलग गडबड करीत ही अधिसूचना काढून न्यायालायचा ही मोठा अवमान केला आहे, यावर संघटना कायदेशीर कारवाई करणार आहे. अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जा वाढवून, सुविधा उपलब्ध करून देऊन, तिथे रिकामी पदे भरून वैद्यकीय जागा वाढविण्याऐवजी सरकार नको ते उद्योग करत डॉक्टर्स कमी आहेत या दुखण्यावर अघोरी उपचार करीत आहे. असे स्पष्टपणे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. यावेळी बोलताना डॉ नवनाथ घुगे यांनी आहे. की, जर शासनाने सदर अधिसूचना तात्काळ मागे घेतली नाही, तर लोकशाही मार्गाने संपूर्ण राज्यभर आंदोलन छेडले जाईल. तसेच हा अन्यायावर कायदेशीर मार्गाने दाद मागणार आहोत. एका वर्षाच्या कोर्स द्वारे जर असे ज्ञान आकलन होत असेल तर मग सहा वर्षांचा कोर्स सरकारने का ठेवला..? असा सवाल डॉ.घुगे यांनी केला.

## पान ४ वरून पुढे...

## राज्य अनुसूचित...

बैठकीस उपस्थिती, मार्गदर्शन व मुक्काम. सोमवार, १४ जुलै रोजी सिंधखेड येथे मातंग स्मशान भूमी प्रकरणी भेट. गेवराई सुशी वडगाव, इटकूर येथे भेट आणि सोयीनुसार अहिल्यानगरकडे प्रयाण.

## 'विकसित महाराष्ट्र...

संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे. विकसित महाराष्ट्राच्या व्हिजनमध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण अभियानाचे उद्धाटन मुख्यमंत्री यांनी १७ जून, २०२५ रोजी केले आहे. सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी पासून गावपातळीवरील कार्यालय प्रमुखांनी सर्वेक्षणामध्ये आपले अभिप्राय नोंदवावेत यासाठी दर्शनी भागावर फलक लावावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

## कामगार विरोधी...

शासकीय सेवेत दाखल करून घ्यावे,भांडवलदार धार्जिने धोरणे रद्द करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या. मोर्चात शिवाजी कुरे, अशोक पोफळे,विनायक पौळ,उर्मिला शेंडगे,अर्चना पांचाळ,उषा औसे,सय्यद फारूख,मुसद्दीक बाबा, बळीराम भुबे,रत्नाकर गोलवकर,सय्यद रज्जाक, शेख बेगम संजीवनी गोरे व इतर कार्यकर्ते मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

## तलवाडा करांना...

ग्रामविकास अधिकारी सोपान मुसळे यांनी व्यक्त करत कर्मचारी यांनी तलवाडा येथील सर्व सामान्य नागरिकांना नियमित पिण्याच्या पाण्याची सोय सुविधा पुरवाव्यात असे सांगितले. तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत पोइतांडा या महसूल गावाला स्वातंत्र्य ग्रामपंचायत चा दर्जा प्राप्त झाल्यानंतर तलवाडा ग्रामपंचायत चे कार्यकारी मंडळ बरखास्त होऊन या ठिकाणीं कामकाज पाहण्यासाठी पंचायत समितीची डेप्युटी इंजिनियर श्री.चोपडे यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली तर ग्रामसेवक पाटील यांच्या जागेवर सोपान मुसळे यांची ग्रामविकास अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून हे दोन्ही प्रशासकीय अधिकारी ग्रामपंचायत चा कारभार सुरळीत चालवण्यासाठी जबाबदारीने काम करतांना दिसत असून गावकऱ्यांनी शुद्ध पाणी पुरवठा करण्याची मागणी करताच त्यांनी पाणी पुरवठा कर्मचारी दत्ता मोरे यांना सूचना देऊन बिलिचिंग पावडर ने पाणी शुद्ध करण्याचे सांगितले.यावेळी मोरे यांनी तात्काळ सार्वजनिक बारव,अंबिकानगर विहीर,आणि गाव तलावातील विहिरीत बिलिचिंग पावडर टाकून शुद्धीकरण केले त्यामुळे गावकऱ्यांनी प्रशासक चोपडे आणि ग्रामविकास अधिकारी मुसळे यांचे आभार मानले.

## 'भारत बंद'ला...

रमेश गायकवाड, अशोक जाधव, पांडुरंग वाणी,सुरेश निर्मळ, भालचंद्र गिरे,आश्रुबा गिरे, सतिश वायभट, संजय घोलप, चिंतामण ढास, गणपत घोलप, बालाजी निर्मळ,सय्यद अख्तर, संजय पावले, जनार्दन भोसले, अंकुश गायकवाड, ज्ञानोबा निर्मळ, बाजीराव दशमे,शेषेराव तागड, हरिभाऊ कदम,बाळु सोनावणे, चोखोबा निर्मळ, जनार्दन वाणी , सर्जेराव घरत, बाबासाहेब वायभट, भास्कर वाणी आदी सहभागी होते. यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बडे,पो.ह. सतिश राऊत आणि सुदाम शेलार यांची उपस्थिती होती. केंद्र सरकारच्या कमाल शेतजमीन धारणा (सिलिंग ) कायदा ,आवश्यक वस्तू कायदा, जमिन अधिग्रहण कायदा या नरभक्षी शेतकरी विरोधी कायद्यांमुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.तर कामगार संघटनांनी संसदेने मंजूर केलेल्या ४ कामगार संहितेवर तिव्र आक्षेप घेतला असुन या संहितामूळे कामगारांचे हक्क कमकुवत होत असुन कामगार संघटनांची ताकद कमी होत असल्याचा दावा केला आहे. केंद्र सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांचा लिंबा गणेश करांमध्ये तिव्र संताप असुन याविरोधात निदर्शने करत भारत बंद ला समर्थन असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

## आ. सत्यजित तांबे...

सामाजिक संघटना गेल्या २८ वर्षापासून युवक विकास, उद्योजकता, शिक्षण, आरोग्य, कृषी अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांत काम करते. श्रीकृष्ण नाईकवाडे यांचे सामाजिक मूलभूत प्रश्न, उद्योजकता, युवक सक्षमीकरण या क्षेत्रात योगदान उल्लेखनीय राहिले आहे. जयहिंद लोकचळवळेचे कार्य अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने बीड जिल्ह्यात संघटनेची वाटचाल त्यांच्या नेतृत्वाखाली अधिक सक्षम आणि परिणाम कारक होईल, असा विश्वास राज्य कार्यकारिणीने व्यक्त केला आहे. या निवडीबद्दल जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. डॉ. सुधीर तांबे साहेब, प्रदेश कार्यकारणी सदस्य आ.मनोज कायंदे, उत्कर्षाताई रूपवते,श्री.रमेश सानप,डॉ, भूषण भदाने, श्री.श्रेयस इंगोले आदिनी शुभेच्छा देताना बीडमध्ये सुधृढ समाज निर्मितीसाठी मार्गदर्शन केले. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि तरुण वर्गातून त्यांचे अभिनंदन व्यक्त होत आहे.

## माजी आमदार...

हे आंदोलन माजी आमदार पृथ्वीराज साठे, अमर भैया देशमुख, राजेश वाहुळे, एडवोकेट इस्माईल गवळी, हामिद चौधरी, मदनलाल परदेशी, संजय भोसले, तारीख आली उस्मानी काँग्रेस शहर अध्यक्ष असिफुद्दीन खतीब त्याचबरोबर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे हजारो कार्यकर्त्यांनी शहरभर भीक मांगो आंदोलन करून नगरपालिका प्रशासनाची लाज काढली. महाराष्ट्र बँकेसमोर येईल बारावा वर झालेल्या अतिक्रमांना बद्दल अंबाजोगाई शहरातील जनतेच्या मनात नेमके अतिक्रमण कोणी केले त्या दोन गाळ्यांचा मालक कोण असे विविध प्रश्न या आंदोलनाने समोर येतील अशाच पद्धतीचे नगरपालिकेची जमीन लाटण्याचे प्रकार उघडीस आणावेत अशी चर्चा जनतेतून होत आहे

## गेवराई तहसील...

अतुल केदार यांना देखील दलालामार्फत १ लाख रुपये दिल्यास निलंबन टाळता येईल असा संदेश देण्यात आल्याचे समजते. मात्र, त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्यामुळे एकतर्फी निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही बाब संपूर्ण यंत्रणेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. या प्रकरणावरून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून निवडक कारवाई केल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवरही संशय व्यक्त होत आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून, दोषी ठरलेल्या पुढील अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी, तहसीलदार श्री. खोमणे, नायब तहसीलदार श्री. कट्टे, नायब तहसीलदार श्री. सोनवणे, संबंधित दलाल/मध्यस्थ यांच्यावर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (संशोधित) अंतर्गत गुन्हा नोंदवून, दोषींना तत्काळ अटक व निलंबन करण्याची मागणी केली आहे.

## महिलांसाठी पंडित...

यासाठी मुलाखतींचे आयोजन केलेले आहे. मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. काही अडचणी असल्यास जयदत्त इंगोले यांना ९८२२७८१८७६ या भ्रमणीध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. बीड येथे गुरुकुल इंग्लिश स्कूल येथे प्राथमिक शिक्षकाची एकूण पाच पदे आहेत. त्यासाठी डी.एड, बी.एड (इंग्रजी) आणि वयोमर्यादा-२५ ते ३५ असावी. एलआयसीमध्ये विमा सखीचे २० पदे असून पात्रता १० वी किंवा १२ वी, वयोमर्यादा-१८ ते ४५, समर्थ नर्सिंग स्कूल येथे टयूटरची चार पदे असून पात्रता बीएससी नर्सिंग, वयोमर्यादा १८ ते ३०, एस.जी सॉप्टवेअर सोल्यूशन येथे ऑफिस मॅनेजर पदाची चार पदे असून पात्रता १२ वी, पदवी आणि वयोमर्यादा १८ते ३०, टाटा लाईफ इन्शुअरंस येथे लीडर न्ड डव्हायजरची २५ पदे असून पात्रता दहावी किंवा १२ वी असावी, असेही कळविण्यात आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

CMYK

दैनिक
# मराठवाडा पत्र

संमिश्र | गुरूवार, दि. १० जुलै २०२५ | पान ३

# बीड तालुक्यात वादाचे कारण ठरू शकणारे अनेक रस्ते खुले

## सामोपचाराने , तातडीने हिवरापहाडी येथील शेतरस्ता खुला; तहसीलदार शेळके यांचा पुढाकार

**बीड । प्रतिनिधी**

हिवरापहाडी येथील अंतर्गत वादाने अडवलेला रस्ता चार जून रोजी अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिमेअंतर्गत समोपचाराने खुला करण्यात आला .

महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताची निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत . विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने



वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून समोपचाराने रस्त्याची प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली आहे.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामन्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावी अशी सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो .हिवरापहाडी येथील शेतरस्त्याच्या मागणीवरून अर्जदार सुरेश यदा लिंगे व इतर यांच्या म्हणण्यानुसार गट नंबर १२५ मध्ये जाण्यासाठी पूर्वापार चालत आलेला रस्ता हा दक्षिण – उत्तर असलेल्या ओढ्यापासून आहे . सदर गट नंबर मध्ये जाणारा ओढ्याचा रस्ता दोन तीन शेतकरी यांनी अडवलेला होता . सुमारे पंचवीस शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग , व्यवसाय करत आहेत . गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार नसून गट नंबर १२५ मध्ये जाण्या– येण्यासाठी हिवरापहाडी ते देवळा या गावच्या शिव रस्त्यावरून रस्ता उपलब्ध आहे अशी भूमिका घेतली होती .

तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम सानप व ग्राम महसूल अधिकारी ओंकार गायके , हिवरापहाडी यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळपाहणी करून रस्ता खुला करणे बाबत आदेशित केले . त्यांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी जायमोक्यावर जाऊन स्थळ पाहणी करून पंचनामा केला व अर्जदार / गैरअर्जदार यांना सस्ती अदालतीचे महत्त्व पटवून देऊन रस्ता खुला करण्यास विनंती केली . स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले. यावेळी मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी ओंकार गायके यांनी तहसीलदार बीड यांच्या आदेशान्वये सस्ती अदालतीचे महत्त्व सांगून सामोपचाराने रस्ता खुला केला . यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच अशोक शिंदे , उपसरपंच राजाभाऊ पालवे , तंटा मुक्ती अध्यक्ष नवनाथ खरात , सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन भारत रूपनोर व आजू बाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार बीड चंद्रकांत शेळके यांचे आभार व्यक्त केले.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये रोजगार नोंदणी शिबिराचे आयोजन



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या वतीने सुरू असलेल्या जागतिक कौशल्य विकास सप्ताहाअंतर्गत राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये रोजगार नोंदणी शिबिराचे आयोजन दिनांक ८, ९ व १० जुलै २०२५ दरम्यान करण्यात आले आहे. या अभियानामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी उस्फूर्तपणे नोंदणी करत आहेत. पहिल्या दिवशी यामध्ये ४० पेक्षा अधिक उमेदवारांनी नाव नोंदणी केली आहे. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगाराच्या संधीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. या नाव नोंदणी उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे व कोर्सचे समन्वयक डॉ. अनंथा गाडे यांनी केले आहे. या नाव नोंदणी सप्ताह उपक्रमामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य डॉ. विजयकुमार कुंभारे व प्रा. निलेश शिंदे हे करत आहेत.

## बाल- वारकऱ्यांच्या 'विठ्ठल' नामाच्या गजराने पेठ बीड दुमदुमले

### मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाची भव्य आकर्षक बालदिंडी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील पेठ बीड भागातील मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल नामाच्या जयघोषात बालदिंडी संपन्न झाली. संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष– श्री. विष्णुदास तापडिया , उपाध्यक्ष– श्री. राजेंद्र मुनोत, सचिव –श्री. रामेश्वर कासट , सहसचिव– श्री. किशोर बाहेती , कोषाध्यक्ष– श्री गंगाभिषण करवा , जेष्ठ संचालक– श्री.भागीरथ चरखा , श्री.जगदीश चरखा, श्री.मुकनलाल लड्डा , श्री.केदार जाजू , माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. लाहोटी सर उपमुख्याध्यापक श्री. हावळे सर पर्यवेक्षक श्री. मालपाणी सर यांच्या शुभहस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. पूजनानंतर इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी भगवान विठ्ठलाच्या भावगीतांवर नृत्य सादर केले तर विद्यार्थीनीने भारूड सादर करून विद्यालयातील व परिसरातील वातावरण भक्तीमय करून टाकले. पालखी पूजनानंतर विद्यालयाच्या प्रांगणात सर्व मान्यवरांनी वारकरी रिंगण करून या बालदिंडीत आपला कृतीयुक्त सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल –रुक्मिणी सह संत तुकाराम, नामदेव, एकनाथ महाराज, संत मीराबाई या संतांच्या भुमिकेसह डॉक्टर, इंजिनिअर यासह अनेक वेशभुषेत ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत पालखी हरिनामाच्या गजरात श्री. विठ्ठल मंदिराकडे मार्गस्थ झाली. या बालदिंडी चा मार्ग विद्यालयापासून ब्राह्मणवाडी, महेश चौक, वैष्णोदेवी मंदिर, शुक्रवार पेठ, काळा हनुमान ठाणा , माऊली चौक, मार्गे विठ्ठल मंदिर व तेथून परत शाळेत असा होता.

दिंडी मार्गा मध्ये श्री. रामबिलास जाजू , श्री. जवाहरलाल सारडा , श्री.



विष्णुदास बियाणी यांनी बालदिंडीचे उत्साहात स्वागत करून पालखीचे पूजन केले. दिंडी मार्गात श्री. अमर नाईकवाडे, वैष्णोदेवी चौकात श्री. संतोष सोहणी, काळा हनुमान ठाणा चौकात श्री. आदित्य सारडा ,माऊली चौकात श्री. दत्तात्रय नलवडे व मित्रपरिवार विठ्ठल मंदिर चौकात श्री. मनोज बाहेती , श्री.द्वारकादास (बाळू शेठ) मुंदडा यांच्यातर्फे पालखी चे पूजन व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले . तसेच माऊली चौकात श्री. सुरज चुंगडे यांच्यातर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर विविध सामाजिक संदेश देणारी फलके ही या बाल दिंडीचे विशेष असे लक्ष वेधून घेत होते, परिसरातील नागरिकांनी आपल्या बाल दिंडीच्या स्वागतासाठी त्यांच्या दारासमोर आकर्षक रांगोळी काढली होती, परिसरातील नागरिक अत्यंत भक्ती भावाने पालखीचे पूजन करत होते, व अतिशय भव्य आणि दिव्य अशा या बाल दिंडीला पाहून समाधान व्यक्त करत होते ,व पालकही या बाल वारकऱ्यांसोबत चालून आपणही या दिंडीचा एक भाग आहोत असे दर्शवत होते इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी माऊली चौक व विठ्ठल मंदिर चौकात अतिशय बहारदार असे वारकरी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली, ही बालदिंडी यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सोहनी सर यांच्या मार्गदर्शनात सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमान लड्डा सर उपप्रमुख श्री. बोरा सर व सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



*बीड तहसील कार्यालय येथील अप्पर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी पुरवठा विभागातील कामकाजाचा आढावा घेतला. ऑनलाईन कामे, समस्या यावर चर्चा केली. त्यावेळी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, सहाय्यक महसूल अधिकारी महादेव चौरे, संतोष मुळीक, श्रीराम वायभट व ऑपरेटर उपस्थित होते.*

## कें.जि.प.शाळा गाढेपिंपळगाव व सिरसाळा येथील जि.प.कें.उच्च प्रा.शाळेत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करा-पत्रकारांची मागणी

### बीड जिल्हाधिकारी यांना मागणीचे दिले निवेदन

**परळी वै. । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे केंद्रीय जिल्हा परिषद शाळा गाढेपिंपळगाव व सिरसाळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सिरसाळा, ता.परळी वै.जि.बीड दोन्ही शाळेमध्ये लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणी योग्य ती चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी या मागणीचे निवेदन बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



यांना आज दि.०९ जुलै २०२५ रोजी परळी येथील शासकीय विश्रामगृह येथे देण्यात आले.

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, परळी तालुक्यातील मौजे गाढेपिंपळगाव केंद्रीय प्राथमिक शाळा येथील पी.एम.श्री.योजनेअंतर्गत जो अनुदान आले आहेत. त्यामध्ये मुख्याध्यापक अशोक घुगे यांनी शाळेच्या मैदानासाठी, झाडे लावा, शाळेची इमारत, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक विभाग नाही, विद्यार्थी व विद्यार्थीनीला गणवेश वाटप नाही, पिण्यासाठी पाणी आर.ओ.नाही, पाण्याची टाकी नाही. पोषण आहार नाही, सौर पॅनल नाही, शौचालय नाही. शाळेला संरक्षण भिंत नाही, विद्यार्थ्यांना पोषण आहारात अंडी, दुध, केळी तसेच पौष्टिक आहार दिला जात नाही. शाळेत फक्त खिचडी करतात पण खिचडी बनविण्यासाठी गॅस मंजूर असून देखील चुलीवर खिचडी शिजवली जाते. विद्यार्थ्यांना जेवणासाठी प्लेट नाहीत अशा पी.एम. श्री.केंद्रीय प्राथमिक शाळांना विविध योजना करण्यासाठी केंद्र सरकारने अनुदान दिले मात्र मुख्याध्यापकांनी बहुतांश योजनेचा लाभ स्वतः घेतला. तब्बल सोळा महिने योजनेसाठी आलेले ३ लाख ३९ हजार रूपयांचे अनुदान मुख्याध्यापक अशोक घुगे यांनी स्वतःच्या खात्यावर ठेवून भ्रष्टाचार केला आहे.

अशोक घुगे तीन महिन्यापुर्वी सेवानिवृत्त झाले आहेत तरी देखील त्याचा मुख्याध्यापक पदाचा चार्ज स्वतः सांभाळत होते.

## पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शिका संघटित व्हा व संघर्ष करा हा डॉ. बाबासाहेबांचा बहुमोल उपदेश लक्षात ठेऊन महामानव अभिवादन ग्रुप; पुढे गेलेल्यांनी मागे असलेल्या समाज बांधवांकरिता बीड शहरात व परिसरात विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत आहेत.डॉ. बाबासाहेबांनी ८जुलै १९४५ रोजी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिन धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर, शिवाजीनगर बीड येथे मोठ्या उत्साहात विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी से. नि. सी. ई.ओ (जी प) पी. व्ही. बनसोडे हे लाभले होते तर से.नी उपनिबंधक (सहकार) ॲड. हनुमंत कांबळे व से.नि जिल्हा प्रबंधक (एल.आय. सी) आयु. यु. एस. वाघमारे लाभले होते. विचार मंचावर अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जि.एम.भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी.वानखेडे व समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले,युवराज सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाईच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड तेजस वडमारे यांनी केले तर प्रास्ताविक जी.एम भोले यांनी करून आपल्या प्रास्ताविकात पी ई एस सोसायटीच्या स्थापने मागची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका सविस्तरपणे विषद केली कार्यक्रमाचे अध्यक्ष पी.व्ही बनसोडे उपस्थिताना संबोधित करताना म्हणाले की शिक्षणाशिवाय माणसाची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात अनिष्ट रूढी परंपरेमुळे वर्गाच्या बाहेर बसून



शिक्षण प्राप्त करणाऱ्या भीमराव या विद्यार्थ्याने विद्येच्या बळावर खंडप्राय आशा भारत देशाचे संविधान लिहिले हे केवळ शिक्षणामुळे साध्य होऊ शकले हे शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाने ओळखले पाहिजे. भीमरावांना छत्रपती शाहू महाराज, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या बहुमोल सहाय्यामुळे परदेशातील नामांकित विद्यापीठातून उच्च विद्याविभूषित होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण त्याचे संपूर्ण जीवन देश हिताकरिता व संपूर्ण मानव जातीच्या कल्याणा करता अर्पण केले. त्यांनी स्थापन केलेल्या पी ई एस शिक्षण संस्थेतून; शिक्षणापासून वंचित असलेल्या व सर्व समाजातील लाखो विद्यार्थी शिकून उच्च पदापर्यंत पोहोचले त्यांचे हे ऋण शिकलेल्यांनी समाजाचे रून फेडण्याचे कार्य डोळ्यासमोर ठेवून आपले जीवन जगणे गरजेचे आहे असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली. याप्रसंगी प्रशांत वासनिक यांनी विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधतांना स्पष्ट केले की शिक्षण क्षेत्रात राजा मिलिंद सारखे विद्यार्थी व भंते नागसेन सारखे गुरु असावयास पाहिजेत भारत भूमीला जगप्रसिद्ध नालंदा, तक्षशिला अशा विद्यापीठांची परंपरा आहे याचा सर्वांनि सार्थ अभिमान ठेवून विद्यार्थ्यांनी राजा मिलिंद सारख्या विद्यार्थ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्या प्राप्त करावी आशा अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले, प्रमुख पाहुणे हनुमंत कांबळे यु एस वाघमारे युवराज सोनवणे यांनी पी ई एस शिक्षण संस्थेबद्दल व शिक्षण हीच उन्नतीची गुरुकिल्ली आहे हे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी एम राऊत यांनी व्यक्त केले तर कार्यक्रमास प्रा. अशोक गायकवाड,के एस वाघमारे, एस.एस.सोनवणे, बी.जी. दळवी, भारत शिरसट, तेजस वडमारे, सुजाता वाघमारे,अंजली विशाल वडमारे, आशाबाई भालेराव, स्वाती वडमारे, आचल वडमारे, कु.किरण वडमारे, रमाबाई सोनवणे उर्मिला वडमारे,राज जाधव, प्रेम जोगदंड, सिद्धार्थ साळवे व परिसरातील बालक बालिका व उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप कार्यक्रमांतर्गत २३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व खाऊ वाटप करून सरनातंयने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विश्व वंदनीय गौतम बुद्ध गुरु पौर्णिमेपासून धम्मप्रवचन मालिका व वर्षावास कार्यक्रमास उपस्थित राहावे : डॉ भागवत साळवे

**माजलगाव । प्रतिनिधी**



भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या वतीन पुज्य भन्ते धम्मप्रिय चैत्यभूमी दादर मुंबई यांचा वर्षावास प्रारंभ व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन जिल्हा शाखा बीड पुर्व च्या अंतर्गत तालुका शाखा माजलगावच्या वतीन आषाढी पौर्णिमा ते आश्वीन पौर्णीमा या तिन महिन्याच्या वर्षावास कालावधीत विविध ठिकाणी शहरी व ग्रामीन भागामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या पवित्र ग्रंथाचे ग्रंथ वाचन चालु असलेल्या ठिकाणी विविध विषयांची धम्मप्रवचन मालीका राबवण्यात येत आहे या कार्यक्रमाचा प्रारंभ दि.१० जुलै २०२५ वार गुरुवार रोजी जिल्हा शाखा बीड पुर्व च्या वतीन राबवण्यात येत आसलेल्या विषय मालीका तील गुरु पौर्णीमा व वर्षावासाचे महत्व या विषयाने सुरवात होत आहे.

दैनिक मराठवाडा पत्र | दि. ०९/०७/२०२५

**महत्त्वाचे कागदपत्रे हरवले आहे.**

श्री. ज्ञानेश्वर रखमाजी थापडे रा. ढेकणमोहा ता. जि. बीड यांचा १२ वी. पासचा गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालय ढेकणमोहाचा दाखला (T.C) हा छत्रपती संभाजीनगर ते बीड बसने प्रवास करीत असताना हरवला आहे. तरी सदरचा १२ वी. पास दाखला (T.C) कोणास सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा ही विनंती.

**संपर्क : श्री. ज्ञानेश्वर रखमाजी थापडे, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड मो. ९७६५५११५०७/ ९४२१३३५०६६**

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
गुरूवार, दि.१० जुलै २०२५ पान ४

## राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे बीड जिल्हा दौऱ्यावर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. गुरूवार, दिनांक १० रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सोबत आढावा बैठक. दुपारी १२ वाजता गेवराई, पाटोदा, बीड, धावर, आष्टी, शिरूर, वडवणी, परळी, माजलगाव, अंबेजोगाई आणि केज येथील गटविकास अधिकारी यांच्यासमवेत दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेची पाहणी व कामकाजांचा आढावा. दुपारी २ ते ३ राखीव व सोयीनुसार बीड येथून परभणीकडे प्रयाण. शनिवार, दिनांक १२ रोजी नांदेडहून बीडमध्ये आगमन. सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत जिल्ह्यातील सामाजिक संघटनांनी आयोजित ▶▶ उर्वरित पान २ वर

# ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ साठी सर्वेक्षणामध्ये नागरिकांनी मत नोंदवावे: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

‘विकसित महाराष्ट्र २०४७’ चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध १६ क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही. https://wa.link/o93s9m किंवा

https://vikasitmaharashtra.civis.vote/consultations/1245/read लिंकवर यावर आपले मत नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत –भारत२०४७ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे.

या कार्यक्रमामध्ये व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. व्हिजन डॉक्युमेंट तयार करताना दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशी टप्पानिहाय उद्दिष्टे ठेवण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंटचा आराखडा तयार करण्यासाठी १६ संकल्पनांवर आधारीत क्षेत्रनिहाय गट बनविण्यात आले आहेत. यामध्ये कृषि, शिक्षण, आरोग्य, ग्राम विकास, नगर विकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान व मानव विकास, मनुष्यबळ व्यवस्थापन असे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या–त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय, अशासकीय ▶▶ उर्वरित पान २ वर

## अमृत अटल जल योजना अंतर्गत झालेल्या पाईपलाईनला पाणी कधी येणार?: शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

जल योजना अंतर्गत बीड शहरात काही ठिकाणी फक्त पाईपलाईन टाकून कनेक्शन पण देण्यात आलेली आहे. तीन ते चार वर्षे झाले तरी तेलगाव नाका, पटेल नगर, कुबा कॉलनी या ठिकाणची मुख्य पाईपलाईन जोडायची राहिलेली आहे.



या संदर्भात मी नगरपरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंधारे मॅडम यांना निवेदन दिलेले आहे तरी अजून पाईपलाईन जोडण्यात आलेली नाही. शहरात राहून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दारोदारी जावे लागत आहे. यासाठी नगरपरिषद प्रशासन , गुत्तेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा हलगर्जीपणा जबाबदार आहे .तरी मुख्य कार्यकारी अधिकारी नीताताई अंधारे मॅडम आपण स्वत: येऊन पाहणी करावी व पाईपलाईन जोडून द्यावी हीच नागरिकाकडून अपेक्षा आहे.

# कामगार विरोधी चार श्रमसंहीता कायदा व जनसुरक्षा विधेयक रद्द करा: शिवाजी कुरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक ९जुलै २०२५बुधवार रोजी सिटू संघटनेच्या वतीने बीड जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्या बाबत माजलगाव उप विभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.



केंद्र सरकारने प्रचलित कामगार कायदे बदलून त्याचे रुपांतर चार श्रमसंहीता कायदयात केले आहे.त्यामुळे कामगारांच्या मुलभूत हक्कांवर गदा आली आहे. हे कायदे भांडवलदारांच्या बाजूने असल्यामुळे देशातील कामगार असुरक्षित झाला आहे.त्यामुळे देशातील सर्व कामगार संघटनांनी एकत्र येऊन या कायद्याची अंमलबजावणी करु नये. यासाठी ९ जुलै २०२५ बुधवार रोजी एक दिवसीय संप पुकारला होता.

महाराष्ट्र सरकारने लोकशाही विरोधी जनसुरक्षा विधेयक आणले आहे. त्यालाही सर्व संघटनांनी एकत्र येऊन विरोध केला आहे. योजना कर्मचाऱ्यांना वेळेवर मोबदला मिळत नाही.गेल्या सहा महिन्यांपासून थकलेला मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे सरकारने कामगार विरोधी धोरणे रद्द करावीत,दरमहा पगार वेळेवर देण्यात यावा,कामगारांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा करांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यास प्रशासन कटिबद्ध: प्रशासक चोपडे - ग्रामसेवक मुसळे

### सार्वजनिक बारव,अंबिकानगर विहीर,गाव तलावातील विहिरीत ब्लिचिंग पावडर

**तलवाडा । प्रतिनिधी**

पावसाळ्यात तलवाडा कराचे आरोग्य हित जोपासण्यासाठी त्यांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी पुरवठा करणे ही ग्रामपंचायत प्रशासनाची जबाबदारी आहे आणि त्यासाठी प्रशासक म्हणून आणि ग्रामविकास अधिकारी या नात्याने आमची संयुक्त जबाबदारी असल्याचे मत नव्याने प्रशासक म्हणून नियुक्त झालेले चोपडे दादा आणि ▶▶ उर्वरित पान २ वर





केंद्र सरकारच्या कामगार - शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांच्या निषेधार्थ...

## ‘भारत वंद’ला लिंवागणेशकरांचा पाठिंवा : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कामगार विरोधी, शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांचा निषेध करण्यासाठी आज दि.९ जुलै बुधवार रोजी १० केंद्रीय कामगार संघटनांनी एकत्र येऊन विविध शेतकरी आणि ग्रामीण कामगार संघटनांच्या समन्वयाने देशव्यापी संप पुकारत भारत बंद ची हाक दिली असुन याला प्रतिसाद देत बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामस्थांनी या भारत बंदला पाठींबा देत छत्रपती शिवाजी महाराज चौकात गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर केंद्र सरकारच्या विरोधात कामगार




आणि शेतकरी विरोधी धोरणे राबविणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, कामगार एकजुटीचा विजय असो, शेतकरी एकजुटीचा विजय असो अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ . गणेश ढवळे,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, अँड.गणेश वाणी, विक्रांत वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, ▶▶ उर्वरित पान २ वर

## आ. सत्यजित तांबे यांच्या जयहिंद लोकचळवळ या संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी श्रीकृष्ण नाईकवाडे यांची वर्णी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात सक्रिय कार्यरत असलेल्या जयहिंद लोकचळवळीच्या विविध पदांवर महाराष्ट्रातील युवकांचे प्रेरणास्थान आमदार सत्यजित तांबे यांनी नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष म्हणून श्रीकृष्ण नाईकवाडे यांची नियुक्ती करण्यात



आली आहे. बीड जिल्ह्याला पहिल्यांदाच युवा नेतृत्व लाभले असून जिल्ह्याभरातून या गोष्टीचे कौतुक व स्वागत होत आहे. त्यांच्या सामाजिक कार्यातील सातत्य, युवकांमध्ये जनजागृती आणि लोकशाही मूल्यांसाठी असलेली बांधिलकी लक्षात घेता ही निवड संघटनेने सर्वानुमते केली आहे. जयहिंद लोकचळवळ ही ▶▶ उर्वरित पान २ वर

# माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेच्या तिजोरीसाठी भीक मांगो आंदोलन !

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र बँकेसमोरील जुने बारव च्या ठिकाणी बुजून ती जमीन लाटून त्या ठिकाणी दुकाने थाटण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी नगरपालिका प्रशासनला चांगलेच धारेवर धरले. दिनांक आठ जुलै रोजी मागील झालेल्या बैठकीत जर नगरपालिकेकडे ते अतिक्रमण काढण्यासाठी पैसा नसेल तर आम्ही शहरभर भीक




मागून तुमची तिजोरी भरण्याचे काम करू असे सांगून आज रोजी महाराष्ट्र बँकेसमोर आंदोलन करण्यात आले. नगरपालिकेची तिजोरी भरण्यासाठी भीक मांगो आंदोलनाची सुरुवात करण्यात आली हे आंदोलन महाराष्ट्र बँकेसमोरून मोंढा शिवाजी चौक गुरुवार पेठ मंडी बाजार बस स्टॅन्ड पंचायत समिती व महाराष्ट्र बँकेसमोर येऊन जमा झालेली सर्व रक्कम पंधरा हजार त्रेपन्न रुपये शहरभर फिरून जमा करण्यात आली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई तहसील कार्यालयातील जन्म प्रमाणपत्र घोटाळा प्रकरणी सखोल चौकशी करण्याची वंचितची मागणी

### आर.डी.सी. शिवकुमार स्वामी यांची कार्यपद्धती अन्यायकारक : अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या अधिपत्याखालील जन्म प्रमाणपत्र नोंदणी प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात महसूल सहायक अतुल केदार यांना अपूर्ण कागदपत्रांच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले असून, या कारवाईच्या पार्श्वभूमीवर गंभीर लाचखोरीचे आरोप समोर आले आहेत.

प्रकरणात तहसीलदार खोमणे, तसेच नायब तहसीलदार कट्टे व सोनवणे यांचाही सहभाग असूनही, त्यांच्यावर कोणतीही निलंबनात्मक कारवाई करण्यात आलेली नाही. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता, केवळ अतुल केदार यांच्यावरच निलंबनाची कारवाई केल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

विश्वसनीय सूत्रांनुसार, नायब तहसीलदार कट्टे व सोनवणे यांनी दलालामार्फत उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांना प्रत्येकी २ लाख रुपये लाच दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नाही.

याच प्रकरणात महसूल सहायक ▶▶ उर्वरित पान २ वर

## महिलांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शुक्रवारी आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बेरोजगार महिला उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत शुक्रवार, ११ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी दोन वेळेत रोजगार मेळाव्याचे आयोजन केल्याचे केंद्राचे सहायक आयुक्त सुशील उचले यांनी सांगितले. या संधीचा पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

नगर रोडवरील चंपावती शाळेच्या पाठीमागे असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (मुलींचे) येथे मेळावा होईल. यामध्ये नामांकित कंपनी,आस्थापनाच्या वतीने महिलांना रोजगाराची संधी मिळावी, ▶▶ उर्वरित पान २ वर

